IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# दलित कवयितत्रींच्या कवीतेतून आलेल्या स्त्री मनाचा विद्रोह

कु. सुनिता बबन नलबे
संशोधक विद्यार्थी
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव,

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात १९६० नंतर अमुलाग्र बदल झालेले आहेत साहित्याविष्कारची स्वतंत्रणे मांडणी होऊ लागली. अर्थात मराठी साहित्यत नव्या प्रवाहांची निर्मिती झाली. त्यात प्रामुख्याने ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, मुस्लिम साहित्य, बालसाहित्य आदिवासी साहित्य, दलित साहित्य आणि तौलनिक साहित्य इ. समावेश होतो. या सर्वच साहित्य प्रवाहांनी स्वतंत्रपणे आपल्या शैलीत साहित्य आविष्कार करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये दलित साहित्य प्रवाह अत्यंत प्रभावीपणे विकसित झालेला आहे. या साहित्य प्रवाहने पारंपारिक साहित्य आविष्काराला छेद देऊन स्वतंत्रपणे साहित्याविष्कार करण्यात पूर्णपणे यशस्वी झाल्याचे दिसून येते. कारण या साहित्याने महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या मार्गाचे अनुकरण करून भारतीय समाजातील जाती व्यवस्था आणि शोषण व्यवस्थेच्या विरूध्द मानवतावादासाठी मानव मुक्तीचे गीत गात दलित साहित्याच्या आरंभ झाला.

मराठी दलित साहित्य प्रामुख्याने 'कविता' वाङ्मयप्रकारने आविष्कृत होण्यास प्रारंभझाला; परंतु या दलित साहित्य प्रवाहात प्रामुख्याने कविता, कथा, आत्मकथने, कादंबरी, नाटक आणि वैचारिक साहित्य लेखन प्रामुख्याने झालेले आहे. त्यात दलित कविता ही तेराव्या शतकातच 'संत चोखामेळा' व त्यांचा मुलगा कर्ममेळा यांच्या अभंगातून अस्पृश्यतेविषयी ठसठसीत व्यक्त झालेल्या आहेत. त्यानंतर ब-याच कालावधीनंतर म. फुले यांच्या 'अखंडा' मधून वंचित व उपेक्षितांचे दुःख आविष्कृत झालले दिसते. त्यानंतर १८८९ मध्ये केशवसुतांनी 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही कविता लिहून समाजातील आर्थिक व सामाजिक दरो आविष्कृत केली. पुढे १९६० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मानवमुक्ती व मानवतावादाची प्रेरणा घेऊन कविता लेखनाला प्रारंभ केला. तत्पूर्वी किसन फागु बनसोडे, दीनबंधु, वामनदादा कर्डक, शाहीर धोंडगे, भिमराव कर्डक, इत्यादीनी मानवमुक्तीचा आविष्कार आपल्या काव्यातून केलेला आहे. इ. स. १९६० नंतर नव्या जोमाने नव्या आविष्कार पध्दतीने दलित काव्यलेखनाला प्रारंभ झाला त्यात प्रामुख्याने नारायण सूर्व, नामदेव ढसाळ, दया पवार, केशव मेश्राम, अर्जुन

डांगळे, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, शरणकुमार लिंबाळे, हिरा बनसोडे, ज्योती लाजेवार, सुरेखा भगत, कुसुम आत्राम, प्रथा लोखंडे, इत्यादी कवी व कवियात्रींनी दलित कविता मराठी साहित्यविश्वात समृध्द विकसित केली. त्यामुळे दलित कवितेची मराठी साहित्यात स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले. कवींच्या तुलनेत कवियांत्रीचे कविता लेखन कमी असले तरी अत्यंत प्रभावीपणे दलित स्त्री संवेदना मांडण्यात यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

**महत्त्वपूर्ण शुब्द:** (कीवर्ड) दलित साहित्य, दलित कविता, स्वी संवेदना, मानवता, मानवता

अस्पृश्यांचे मनुष्यत्व नाकारणा-या प्रस्तापितांच्या प्रवृत्तीला नकार देत दलित साहित्यांनी विद्रोहाची भूमिका स्विकारली. प्रस्तापित समाजव्यवस्थेच्या संदर्भात विद्रोहाचे स्वरूप आहे. त्यांच्या लेखनात विद्रोहाबरोबर विध्वंसकता येताना दिसते; परंतु दलित साहित्यातून येणारा विद्रोह, विनाशक आणि वास्तवताकडे जाणारा आहे. या संदर्भात डॉ. गंगाधर पाणतावणे लिहितात, "माणसाचे अवमूल्यन व अपमान करणा-या प्रवृत्तीला, प्रकृतीला व वाङ्मयाला व अपमान करणा-या प्रवृत्तीला, प्रकृतीला व वाङ्मयाला आयुष्यभर नकार देणारा आहे, विलगतावादाला पुराणप्रियतेला, भेदवादी विचाराला नकार म्हणजे विद्रोह नकार ही संकल्पना मानसिकतेशी संबध्द ओह. म्हणून विद्रोह हे न संपणारे युध्द आहे ते जसे बाहेरच्या छुप्या व प्रगट शत्रुशी आहे. तसेच ते आतल्या शत्रुशीही आहे. ही बाब दलित साहित्यातून ठळकपणे जाणवते."[१] अर्थात दलित साहित्यातून आविष्कृत होणारा विद्रोह हा अत्येत डोळस आहे. म्हणूनच विषमताधिष्ठीत शोषणाला दलित साहित्य नकार देतांना दिसते. शतकानुशतके बहुजन समाज भष्ट्र वर्णव्यवस्थेमुळे ज्ञानापासून दूर ठेवला गेला. अज्ञानामुळेच दलितांचे जातीय, मानसिकता, शारीरिक, वैचारिक, लैंगिक इत्यादी सर्व स्तरावर, अस्तित्त्वच नाकारले. त्यामुळेच दलित साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून नाकारलेपणाचा विरोध केला आहे. दलितांना पशुतुल्य जीवन जगण्यास प्रवृत्त करणा-या रूढी-परंपरा, संस्कृती आणि जातीव्यवस्थेला हे साहित्य न कार देताना दिसते.

भारतातील बातुर्वर्ण्यव्ययवरथेत निम्न जातीत जन्माला आलेल्या समुहाशी येचील संस्तोही एक मित्र स्वरूपाचे आचरण करीत आले आहे. त्या भेदभावाच्या संदर्भात हिरा बनसोडे लिहितात.

“हे पाषाणहृदय संस्कृतो अनाथांच्या  
आर्त दुःखात  
कधी झाली नाहीस तु आमची माय मावली  
ग्रीष्माच्या उन्हात पोळत असतांना  
कधी धरली नाहीस आमच्यावर मायसावली  
शतकांनी आंदण दिलेल्या काळोखात धरतांना  
ठेचकाळतांना  
तुझ्या नेत्रांचे कमळदिवे कधी प्रकाशलेच नाहीत  
हुंदक्यांची आर्द्र गाणी गातांना  
मायेची मखमली अंगाई तू कधी जोजावलीच नाही”[२]

अर्थात हजारो वर्षांच्या दलितांच्या वाट्याला आलेले अपमानीत, अवमानीत, पशूर्तुल्य जगण्याचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण हिरा बनसोडे यांनी केलेले आहे. या कवितेतून आलेला विद्रोह हा एक स्त्री म्हणून पुरुषप्रधान संस्कृती तिच्या सर्व प्रकारच्या अस्तित्त्वाला स्वीकारत नाही. एक स्त्री म्हणून तिला भिन्न स्वरूपाची वागणूक दिली जाते, म्हणून कवियांत्री स्त्री अस्तित्त्वाला नाकारणा-या या परंपरावादी संस्कृतीला कवियात्री नाकारते. पुढे भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीचे नेमके स्थान कोणते? यासंदर्भात धम्माज्योती कांबळे म्हणतात,

"हुंड्याऐवजी मोठमोठ्या वस्तु उकळतात
वर दक्षिणेऐवजी पेकेज दूर भारतात
सात वचनाऐवजी सात दिवस मदत देतात
मुदतीपूर्वीच वधूला विष पाजतात
प्रतीक तेव्हाही बदलली,
प्रथा मात्र त्याच घरोघरी
मुलीच्या व्यथा मात्र त्याच”[३]

अर्थात आज एकवीसाव्या शतकात अमलाग्र बदल झाले. या बदलानुसार विवाह पध्दतीतही मोठ्या प्रमाणात परिवर्तने वाली; परंतु स्त्रीला एखाद्या वस्तुप्रमाणे वापरण्याची पध्दतो मात्र आजही निदर्शनात कायम आहे मुली जन्मापासून तिला वेगळ्या पध्दतीने वागणूक दिली जाते. परक्याचे धन म्हणून तिच्या इच्छा आकांक्षावर अंकुश लावला जातो. मोठी होतच जात आणि समाजव्यवस्थेच्या गुलामगिरीमुळे तिचे लग्न लावतात. अर्थ व्यवहाराचे साधन म्हणून तिचा उपयोग करता. एवढेच नाही तर परिस्थितीनुसार तिला प्राणलाही मुकावे लागते. तसे पाहता ही परिस्थिती आजही कायम असलेली दिसते. या मन पिळवून टाकणा-या वास्तवाचा अविष्कार कवियात्रीने केलेला दिसतो.

भारतीय संस्कृतीने निर्धारित केलेल्या परंपरांमुळे स्त्रीला एका चौकटीत जीवन व्यथित करावे लागते. स्त्री एक संस्कृतीची वाहक म्हणून शतकानुशतके दास्यत्व स्त्रीच्याच माध्यमातून संक्रमित केली जाते. यासंदर्भात प्रज्ञा दया पवार लिहितात.

“सीता-सावित्री" उर्मिला
अधिसत्तेनं लादलेल्या मिथकांचा कंटेनर
डोक्यावर वाहून नेणा-या
सावल्याच फक्त !”[४]

अर्थात प्रज्ञा पवार संस्कृतीच्या माध्यमातून स्त्रीयांचे होणारी घुसमठ अत्यंत विनाशक वाटते.

म्हणून 'स्त्री' ला एक व्यक्ती असण्याला अंत करणारी संस्कृती नाकारतांना दिसते. दलित कवयित्री रूढी-परंपरा आणि संस्कृतीला नाकारतात, परंतु हा नकार परिवर्तनवादी असल्याने एक मूर्त स्वरूपात सकारात्मक स्वीकारही येथे दिसतो. त्यामुळेच हा

काव्याविष्कार अत्यंत वाटतो. डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीचा विचार नकाराचे अधिष्ठान असल्याने ते कवितेतून आविष्कृत होणे साहजिक आहे.

"आज कुठे सुरू इन्शाली आहे अस्मितेची लढाई

कळू लागण्यात इथल्या पोकळ संस्कृतीच्या खाणाखुणा

समजू लागलेत

इवल्या मडक्या मंदुचे डावपेच

...........................................................

आमच्या घामावर पोसणा-या

संस्कृतीच्या दलालांनो

आता सावध रहा

लवकरच आमच्या हाती येधील"५

अर्थात शतकानुशतके दलितांचे माणूसपण नाकारणा-या प्रस्थापित संस्कृतीला नाकारतात. या नकारामागे फुले व आंबेडकरांची विचारधारा आहे. या नकारातून परिवर्तनवादी विचाराच्या आधारे दलित कवयित्री भविष्याचे आशावादी सुचक करतात.

स्वभाव आणि परिवर्तनवादी विचारामुळे या सर्व कवयित्री स्वी एक माणूसचं आहे, याबद्दल अत्यंत आग्रही पुढाकार घेतांना दिसतात.

"शोषण म्हणजे

संस्कृती नव्हे

संस्कृती म्हणजे

जगू देणं होय"६

अर्थात समतेचे पुरस्कर्ते महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना सहमत असलेल्या संस्कृतीचा खरा अर्थ या ठिकाणी कवयित्रीने स्पष्टपणे आविष्कृत केला आहे.

मानवाला केंद्रबिंदू मानणा-या फुले आणि आंबेडकरी विचारांची कास धरणा-या दलित कवयित्री आहेत. एक स्वी म्हणून आणि त्यातल्या त्यात दलित स्त्री म्हणून भारतीय समाजव्यवस्थेत जे पशुतुल्य वेदना वाट्याला आल्या त्यातून बाहेर पडण्यासाठो मानवतुक्तीचा विचार हाच अंतिम मार्ग आहे. याचे भान असणारी कवयित्री स्वतःचे अस्तित्व आप्ल्या कवितेतून चित्रित करते.

"झुंडशाहोत चालत नाही तो

आमच्या शिपाई"७

सभोवतालच्या संधी साधू परिस्थितीचे नेमके भान कवयित्रीला असलेले दिसते. हा एक प्रकारचा पारंपारिक समाजव्यवस्थेशी असलेला विद्रोह आहे. तिला विचारांची पातळीचा अंदाज आल्याने आपण कोणत्या प्रकारच्या समाजात गेले पाहिजे याचे आत्मभान जागृत झाले आहे.

दलित कवयित्री जात, धर्म, लिंगाच्या पलीकडे जाऊन मानवधर्माला सर्वस्वी स्विकारणा-या विचारामुळे ती या संस्कृतीचे आचरण करणा-याशी लढण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. अशा प्रकारचा संघर्ष इतका साधा, सरळ आणि सोपा नाही याची जाणीवही त्यांना आहे. म्हणून सर्वकष संघर्षासाठी तयार असलेली कवयित्री लिहिते,

“जाळले जरी स्वप्न माझे मी क्षमा करणार नाही.
निश्याची ज्योत घेण्या मी कधी ढळणार नाही.
कैक केले वैन त्यांनी हारलेल्या या मनाशी
जिंकण्याची ती लढाई मी कधी करणार नाही.”८

अर्थात फुले-आंबेडकरांच्या स्वकारलेल्या विचारांच्या लढाईत अनेक विध प्रसंगांना सामोरे जाण्याची तयारी कवयित्रीची असलेली तिच्या आविष्कारातून दिसते. ती कवयित्री स्वतःचे आत्मभान झालेले दिसून येते.

या विषमताधिष्ठीत समाजव्यवस्थेला दलित स्वी ने अवहेलना, अपमान शारीरिक, मानसिक शोषणा विरूध्द केलेला संघर्ष आणि त्या दिशेने उचललेले पाऊल हे अत्यंत कठीण आहे, परंतु अंगीकारलेला एक क्रांतीकारी परिवर्तनाचा विचार अत्यंत तर्कबध्द असल्याने त्यांच्यात कृतिशील धैर्य आले आहे. कवयित्री म्हणते.

"माझं मला माहित आहे
मी विद्रोही कशी झाले
जातीयतेची बंधने तोडून
समतेची पुरस्कती झाले
माझं मला माहित
मी बोलती कशी झाले
धुंकण्याची ज्यांनी केली मनाई
त्यांचे तोंड ठेचता आले."९

कवयित्रीने एक स्त्री म्हणून विद्रोही भूमिका घेताना जीवन यात्रेच्या वाटेला आलेल्या अवहेलना, वेदनांचा पोळ या ठिकाणी आविष्कृत केलेला आहे. भारतातील पुरूषप्रधान संस्कृतीचे आचरण करणा-या समाजव्यवस्थेच्या विरोधात स्वतःच्या विचाराची भूमिका स्पष्टपणे मांडूण अनेकविध संघर्षाला स्वीयांना कशाप्रकारे सामोरे जावे लागते, परंतु स्वतःचे माणूपण नाकारणा-या न्यायव्यवस्था विरूध्द कवयित्री आपल्या विचारांद्वारे ठाम भूमिका घेतांना दिसते. कवयित्रीच्या विचानांना एक प्रकारची स्पष्टता आल्याने काव्याविष्काराला एक धैर्य प्राप्त झाले आहे. त्यामुळे स्वतः त्यामुळे स्वतःला नेकम काय पाहिजे, हे स्पष्ट करते.

"मला हवाय फक्त

माझा मानवीय चेहरा

माझी लढाई

तुझयाशी नव्हतीच रे कधीच

तुज्यातल्या पुरूषी सत्तेशी होतो"[१०]

अर्थात येथील समाजव्यवस्थेन स्वीच्या सामर्थ्याला नकारले. देवा-धर्माच्या नावाखाली तिचे वेळोवेळी उदात्तीकरणही केले. या सर्व प्रकार कुटील डावपेचांमुळे या पुरुषप्रधान संस्कृतीने स्वीच्या स्वातंत्र्यावर नेहमी टांगती तलवार ठेवली. तिचे स्वातंत्र्य अमान्य केले गेले. परंतु आत्मभाव आलेल्या दलित कवियत्रीने अंगीकारलेला परिवर्तनवादी विचार मनुप्रणीत समाज व्यवस्थेला विचार प्रवृत्त करतांना दिसते.

दलित कवियत्रीच्या कवितेतून आलेल्या विद्रोहाचे स्वरूप अंतिम टोकाचे नसून केवळ 'मानवी मुल्यांचा विचार करणारे आहे. भारतीय संस्कृती आणि समाजव्यवस्थेने अनेक अंगांनी दलित आणि स्वीया यांचे माणूस असणे नाकारले आहे. त्यामुळे अशा घटकांची आंमलबजावणी करणा-या पुरुषप्रधान संस्कृतीला दलित कवयित्री नाकरतांना दिसतात. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीचा विचार त्यांच्या विद्रोह आणि नकाराचा मुळ पाया असल्याने माणूसपण स्वीकारणा-या तत्त्वांना प्राधान्य देतांना कवयित्री दिसून येतात. स्वीकडे एक माणूस माणून पहा यासाठी दलित कवयित्री आग्रही असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**

१. डॉ. मनोहर जाधव (संपा.), 'साहित्यशोध आणि संवाद', सुविधा प्रकाशन, पुणे ऑगस्ट २००० पृ.८८

२. हिरा बनसोडे, 'फिर्याद', समाज प्रबोधन संस्था प्रकाशन, पुणे, मार्च १९८४, पृ.२४

३. धम्मज्योती कांबळे, चंद्रजोध सूर्य होता, अंकुर प्रकाशन, अकोला, पुणे, मे २०१०, पृ.४६

४. प्रज्ञा लोखंडे, मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००७, पृ.४४

५. कविता मोरवणकर, मुक्ता, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, नोव्हेंबर, २००७, पृ.७४

६. उषा हिगोणेकर, मुद्रालेख, मुद्रालेखन, सुविधा प्रकाशन, पुणे, १९९९, पृ.६०

७. आशा माधव, मानगळ, सेवाप्रकाशनं, अमरावती, मे १९८१, पृ.११

८. उनि, मुक्ता, पृ.८०

९. सुरेखा भगत, साक्ष, प्रशांत प्रकाशन, बुडढाणा, १९९१, पृ.११

१०. संध्या रंगारी, संध्यारंग, स्नेहवर्धन पब्लिकशन हाऊस, पुणे, पृ.२०१०, पृ.१६२